# दुष्काळग्रस्त महाराष्ट्रांत रोजगार हमी योजनेचे स्थान

**१९८६ दैनिक सकाळ**

महाराष्ट्रातील सर्वांच्या लक्षात राहण्यासारखा, मोठा, सर्व राज्यभर पसरलेला दुष्काळ म्हणजे १९७२-७३ चा दुष्काळ. हा दुष्काळ इतक्या मोठया प्रमाणवर कसा आला, पावसाचे प्रमाण सर्व राज्यभर कसे कमी झाले आणि दुष्काळाचा मुकाबला अचानकपणे, अनपेक्षितपणे करावा लागल्यामुळे काय काय घडले याचा खोलवर विचार केल्यानंतर, अशी परिस्थिति पुन्हा निर्माण होऊ नये म्हणून राज्य शासनाला धोरण आखणे भाग होते. हे धोरण म्हणजेच रोजगार हमी योजना.

रोजगार हमी योजनेखाली काम मागणा-या अकुशल मजुरांसाठी देता येणारे काम म्हणजे रस्ते --मातीचे, मुरमाचे व खडीचे रस्ते, पाझार तलाव किंवा लघुसिंचन तलाव, वनीकरणाचे कार्यक्रम, रस्त्याच्या कडेला झाडे लावण्याचा कार्यक्रम व मृदासंधारणाची कामे. ही कामें अनुक्रमे बांधकाम विभाग, सिंचन, वनीकरण व मृदासंधारण विभागाच्या अखत्यारीत येतात. एकूण नियोजनाची जबाबदारी कलेक्टरवर टाकण्यांत येते.

गेल्या बारा वर्षांच्या काकात संपूर्ण महाराष्ट्र भर मातीचे व खडीचें रस्ते, पाझर तलाव, लघुसिंचन तलाब इत्यादी मोठा ली काये  समावून धेतले जात ही उपलब्ध कामे कमी साली तेंन्हा वनीकरण व मृदासंधाणाच्या कामांकडे लक्ष गेले.  खुप करून झाली. एकेका कामावर प्रसंगी हजार, दोन हजार मजूर.

या पैकी मृदासंधारणाची कामे शेतक-यांच्या जमिनीवर म्हणजे खासगी जागेत करावी लागतात. तसेच वनीकरणाची कामेदेखील खासगी जागेत घेण्याची परवानगी नुकतीच देण्यात आली आहे. मात्र मृदासंधारणाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या त्या शेतक-याची जमीन त्याच्या शेताच्या कामासाठी मोकळी होते. इतकेच नव्हे तर जास्त उपयोगाची ठरते . उलट जिथे वनीकरण कामे केली असतील तिथे मात्र सुमारे दहा वर्षे ही झाडे तोडता येणार नसल्यामुले ती जमीन शेतीकामासाठी वापरता येत नाही आणि म्हणूनच वनीकरणासाठी जमीन देण्याला शेतकरी, विशेषतः लहान शेतकरी सहसा कबूल होत नाहीत, असा अनुभव आहे.

या योजनेमधे गेल्या आठ - दहा वर्षाच्या काळात बरीच प्रमाणबद्धता ( Standardisation) आलेली असून कामांवर देखरेख ( Inspection) कुणी व कशी करावी, मजुरांना रोजगार कसा, कधी व कमीत कमी किती द्यावा, कामावर माहितीदर्शक फलक लावावे, शेडची सोय करावी, अबजारे पुरवावी असे बरेच नियम केले गेले आहेत. रोजगार हमी समितीची स्थापना केलेली आहे आणि त्यांच्या विभागवार व जिल्हावार बैठकी होऊन रोजगार हमी योजनेचे काम सुनियोजित व सुसूत्रपणे चालावे, अशी व्यवस्था केली आहे.

असे असताना आज आपल्याला काय चित्र दिसून येते ? १९७२-७३ च्या दुष्काळानंतर पुन्हा पुन्हा दुष्काळी परिस्थिति निर्माण होत आहे. तरीदेखील १९७२-७३ मध्ये कामगारांचे लोंढेच्या लोंढे दिसत होते तसे आता दिसून येत नाहीत. क्वचित् लोंढे असतात पण ते काही गावांपुरते -

एखाद्या तालुक्यापुरते - एखाद्या जिल्हातील काही भागांपुरते मर्यादित राहतात. प्रत्येक जिल्हात ऑन शेल्फ कामांची निळी प्रत (Blue Print) तयार ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्येक तालुक्यात केल्या जाऊ शकणा-या कामांची यादी केली जाते. कधी कधी तालुक्यातल्या तालुक्यात-देखील १०-१५ गांवामागे एक या पद्धतीने कामांची यादी करता येते - केली आते.

१९७२-७३ मधील व आजच्या दुष्काळात दोन मोठे फरक आहेत. पहिला फरक म्हणजे त्यावेळी हाती घेतलेल्या दुष्काळी कामांमध्ये आजच्या रोजगार हमी योजना कांमाइतकी सुसूत्रता निर्माण झालेली नसल्याने, जिथे जिथे काम सुरू करावे लागले तिथे तिथे शासनाला फार मोठ्या प्रमाणावर प्रयत्नांची शर्थ करावी लागली. तसेच दूरदूरच्या गांवातून माणासाचे लोंढे कामाच्या ठिकाणी येत होते आणि ते देखील अडचणी घेऊन येत होते व अडचणी निर्माण करीत होते. आता दुष्काळ आला तरी दुष्काळी कामांची परिस्थिति पुष्कळ सुधारली आहे. त्यांत सूसुगपणा आता आहे.

त्या व आताच्या दुष्काळात दुसरा महत्वाचा फरक म्हणजे पिण्याचा पाण्याचा. १९७२-७३ मध्ये प्रत्यक्ष पावसाचे प्रमाण फार कमी होते तरी विहीरी कायमपणे कोरड्या राहिल्या नव्हत्या. कूपनलिका (Borewell) ना पाणी लागत होते आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची गरज पडली नव्हती. आता हे चित्र बदहलेले आहे.

महाराष्ट्राच्या पश्चिम बाजूला उत्तर-दक्षिण पसरलेला सह्याद्री, ढग अडवतो, पाऊस आणतो. हे पाणी सह्याद्रीच्या पठारावरून पश्चिम आणि पूर्व बाजला वाहून जाते. पश्चिमेकडे कोकणात जाणारे अगदी थोडे पाणी जमिनात मुरते किंवा विहिरींमध्ये उतरते पण बहुतकरून समुद्रातच वाहून जाते. या उलट पूर्वेकडे येणा-या पाण्यामुळे आपली पश्चिम घाटातली हिरवळ आणि जंगले टिकून होती. नद्यांमध्ये पाणी वाहात होते, ते पाणी विहिरीपर्यंत जात होते आणि हे पाणी शेतीला पुरत होते. हा सर्व भूतकाळ झाला आहे किंवा होऊ पाहत आहे. सह्याद्रीच्या पूर्वेला १०-२० किलोमीटरपर्यतच्या उभ्या पट्टयांत सह्याद्रीवर अडवलेल्या ढगांचा उपयोग होतो आणि त्यांना ५०-६० इंचापर्यंत पाऊस मिळतो. जसे जसे आपण पूर्वेकडे येऊ तसे तसे हे प्रमाण कमी होऊन ६-८ इंचावर पोहोचते. त्याच्या पलीकडील भागाला पूर्वेकडून येणा-या मानसूनी पावसाचे पाणी मिळते. अशा त-हेने सहाद्रीच्या पूर्वेकडील २० किलोमीटापासून ते ८० किलोमीटरच्या पट्टयापर्यंत प्रत्यक्ष पावसाचे पाणी अत्यल्प प्रमाणात मिळते. हे भाग म्हणजे नाशिक जिल्हातील मालेगाव आणि सिन्नर तालुके, अहमदनगरमधील नेवासा, पारनेरसारखे तालुके, पुण्यातील शिरूर, जुन्नर तालुके, सांगलीमधील कवठे-महांकाळ, जत , खानपूर तालुके, सोलापूरचे सांगोला, माढा तालुके, तर उस्मानाबाद, लातूर, बीड , परभणी, औरंगाबाद, अकोला, यवतमाल, धुळे हे जिल्हे. या भागांच्या दुष्काळाबाबत सध्या आपण बरेच ऐकतो.

गेल्या बारा वर्चत या भागांना दुष्काळाची व पाणी टंचाईची झळ पूर्वीपेक्षा ब-याच मोठ्या प्रमाणावर जाणवली. याला तीन कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे सह्याद्रीच्या पठारावर भरपूर मोठ्या प्रमाणावर जंगलतोड झाल्यामुळे पावसाचे प्रमाणच मुळात कमी झाले आहे. त्यामुळे नद्यांमधून वाहून येण-या पाण्याचे प्रमाण कमी झाले आहे. दुसरे कारण म्हणजे जिथे जिथे नद्यांवर बांध घातले गेले, त्या त्या नद्यांच्या खाली येणा-या लांबच्या गांवामध्ये विहिरींतील पाण्याची पातळी

खाली गेली. पात्रातून येणा-रे पाणी जमिनीत झिरपून ज्या गांवाना पाणीपुरवठा होत होता त्या गांवात आज जर कालव्याचे पाणी नसेल तर पाण्याचे काही साधन उरलेले नाही. नद्यांवरील बांधामुळे हे झाले असे जरी निश्चितपणे म्हणता येत नसले तरी हेही एक महत्वाचे कारण आहे, हे विसरून चालणार नाही. तिसरे कारण म्हणजे विहिरीतील पाण्याचा उपसा. ज्या तालुक्यात मोठ्या प्रमाणवर पंपाने विहिरीतील पाण्याचा उपसा झाला आहे तिथे जर मोठ्या नंद्यातून येणारे पाणी कायमपणे मिळत नसेल तर विहिरीतील पाण्याची पातळी खाली खालीच जाणार..

ज्या ज्या तालुक्यात पावसाचे प्रमाण १० ते २५ इंचावरून ६ ते १५ इंचावर आलेले आहे त्या सर्व तालुक्यांमध्ये ऊस तोडीचा सीझन संपल्यावर म्हणजेच एप्रिलपासून जुलैपर्यंत, तसेच पावसाअभावी खरीप पेरण्या होऊ शकल्या नाहीत तर ऑक्टोबरपर्यंत मोठ्या प्रमाणावर रोहयो कामाची मागणी येते व मजुरांची संख्यादेखील फार मोठी असते. नगरसारख्या जिल्ह्यांत ही मागणी सहज एक ते दीड लाखापर्यंत जाते आणि दुष्काळी तालुक्यांतून ही मागणी दहा हजारापर्यंत जाऊ शकते. एकेका गावातून दोन - तीनशे मजूर असण्याची घटना आता नवीन उरलेली नाही. अशा परिस्थितीत ज्या ठिकाणी मोठे काम देणाप्या सिंचन व रस्ते विभागांच्या साईट्स संपल्या असून फत्क वनीकरण व मृदासंधारणाची कामे निधू शकतील त्या ठिकाणी रोहयो चे नियोजन सतत लक्षपूर्वक करावे लागते. एक मोठे काम कादून दिले, आता आराम असा विचार करता येत नाही - दर पंधरा बीस दिवसांनी नवे काम शोधणे त्या कामासाठी स्टाफ चे मोबिलायझेशन करण इत्यादि लक्ष करावे लागते.

वनीकरणांच्या कामांसाठी जंगलपड किंवा गायरान जागा असल्याशिवाय वनीकरणाची कामे करता येत नाहीत. तसेच वनीकरणासाठी लागणा-या खड्ड्यांच्या कामाची सुरूवात कधीतरी करून चालत नाही. जानेवरीमध्ये कामाची सुरूवात करून जून-जुलैमध्ये वृक्षारोपण करावे लागते त्यामुळे रोहयो कामाची मागणी वाढल्यांनतर वनीकरणाच्या कामावर निश्चितपणे अवलंबून राहता येत नाही. याहीपेक्षा वाईट अवस्था मृदासंधारणच्या कामांची आहे. मृदासंधारणाच्या एका कामावर साधारणपणे २० ते ३० मजूर पुरेसे असतात. फारच मोठे काम काढून १०० पर्यंत मजुरांना घेतले जाऊ शकते. त्यामुळे जर एखाद्या गावात दुष्काळी महिन्यात २००-३०० मजूर कामावर येणार असतील आणि फक्त मृदासंधारणाच्या कामावर अवलंबून रहायचे असेल तर किमान ५ ते ६ कामांच्या योजना व खर्चाचे आराखडे तयार असावे लागतात व ते राबिवण्यासाठी तेवढे कृषि अधिकारी त्या गावी नियुक्त करावे लागतात. त्यातून पुन्हा शेतावर करावयाचे मृदासंधारणाचे काम फक्त शेत मोकळे असतानाच केले जाऊ शकते. यामध्ये काटेकोर नियोजन आणि सूसूत्रता नसेल तर ही कामे होऊ शकत नाहीत. खासगी शेतावर करावयाची कामे म्हणजे कंटूर बंडिंग व लेव्हलिंग तसेच नालाबंडिगचे काम देखील जून महिन्याच्या आत संपवावे लागते त्यामुळे मृदासंधारणाच्या रोहयो कामांचे नियोजन नुसते तालुकावार किंवा गाववार करून भागत पाही तर कोणत्या महिन्यात कोणते काम घेता येऊ शकेल हे महिनावार नियोजन देरवील करावे लागते.

खरे तर कृषि खात्याच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्यात मृदासंधारणाची इतकी कामे पडून आहेत की, दर वर्षी १० कोटी रूपयांची तरतूद केली तर मृदासंधारणाची कामे पुढील किमान २० वर्षे पुरण्यासारखी आहेत. पण एकीकडे कृषि खात्याच्या बजेटची तरतूद पुरेशी नाही

म्हणून खात्याच्या बजेटमधून ही कामे घेता येत नाहीत, असे मृदासंधारण खात्यामर्फत सांगितले जाते, तर दुसरीकडे रोहयोखाली बजेटची तरतूद असताना नियोजनाअभावी या बजेटचा वापर करून घेणे अशक्य होते.

रोजगार हमी योजना म्हणजे अकुशल मजुरांसाठी कामाची हमी असे समीकरण गृहित धरणे चुकीचे ठरेल. जे मजूर आज अकुशल आहेत त्यांना थोडेफार प्रशिक्षण देणे, त्यांना कुशलता प्राप्त करून देणे, किमान अर्धकुशल कामगार म्हणून तरी ते काम करू शकतील अशी परिस्थिति निर्माण करणे त्यासाठी आवश्यक प्रशिक्षणाची सोय करणे हे देखील आवश्यक आहे. ही गरज ओळखून रोहयोचे पुढील स्वरूप टरवले गेले पाहिजे. हे कांम त्यांना फारसा कालापव्यय न करता शिकवता आले पाहिजे. तसेच या शिक्षणानंतर त्यांना देता येऊ शकेल असे रोहयोचे काम देखील शासनामार्फत सुरू कसे करता येईल हा विचार करा पाहिजे. एकेका कामावर २०० ते ३०० अल्प प्रशिक्षित मजुरांना तरी सामावून घेता आले पाहिजे. असे कोणते काम शोधावे ?

उत्तरादाखल दोन प्रयोग सुचवता येतील. शासनाच्या वनीकरण कार्यक्रमांतर्गत मोठ्या प्रमाणावर तुतीची लागवड केली, या लागवडीच्या संगोपनाचे व छाटणीचे प्रशिक्षण कांही कामगारांना दिले, तसेच तुतीच्या पानांचा उपयोग करून रेशमाचे किडे जोपासण्याचे प्रशिक्षण काही कामगारांना दिले व त्यांना तुतीच्या पानांचा हुकमी साठा उपलब्ध करून दिला, तसेच रेशमाचे कोश त्यांच्या कडून एका ठराविक किंमतीला विकत घेण्याची जबाबदारी शासनाने उचलली तर या सर्व कांमावर १००-१५० कामागांराना कायम काम देता येईल. त्याही पुढे जाऊन त्यांना मागावर विणण्याचे प्रशिक्षण दिले तर त्यांच्याकडून रेशीम उत्पादन करून घेता येईल व त्यामध्ये अजून १००-१५० मजुरांना सामावून घेता येईल.

असाच दुसरा उपाय म्हणजे घोंगडया विणण्याचा. आज महाराष्ट्रात निर्माण होणाऱ्या लोकरीपैकी निम्याहून जास्त लोकर परप्रांतात जाते. तिथे चांगल्या प्रतीची ब्लँकेट तयार होतात व चांगल्या किंमतीत विकली जातात. जी लोकर आपल्याकडे शिल्लक राहून आपले धनगर घोंगडया विणतात त्या फक्त खेडोपाडीचे शेतकरीच विकत घेतात. त्यामुळे बाजारपेठ मर्यादित असते, शिवाय किंमत चांगली येत नाही.

आपल्याकडे पैदा होणारी लोकर इथेच का वापरता येत नाहीं ? इतर प्रातांतून ज्या उतम प्रतीची ब्लँकेट बनतात तशी इथे बनावीत यासाठी प्रयत्न केल्यास आपण किती रोजगार उपलब्ध करू शकतो ? आज एकट्या सांगली जिल्ह्यांत धनगर समाजातील किमान हजार कुटुंबे म्हणजे किमान ३,००० कामगार घोंगडया विणण्याच्या धंद्यांत आहेत. त्याना चांगले प्रशिक्षण देऊन रोहयो कामांची व्याप्ती वाढवता येईल.

अशी कित्येक उदाहरणे शोधावी लागतील. जे पर्यायी काम रोहयोसाठी सुचवायचे त्यामध्ये जास्तीतजास्त मजूर सामावून धेण्याची क्षमता असली पाहिजे. म्हणजे ते काम ग्रामोद्योग, कुटिरोद्योग या धर्तीवर असले पाहिजे. ते बरेच ठिकाणी सुरू करता आले पाहिजे. तरच रोहयोमार्फत आपण इथून पुढे येणा-या दुष्काळांना तोंड देऊ शकू. असे पर्याय शोधण्याचे व ते राबवण्याची गरज आज निर्माण झाली आहे हे मात्र निश्चित.

---